# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २०.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १९/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १९७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,१७,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १९/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ८५.३६ लिटर दारू असा एकुण ७०,८००/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. १९/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०४ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ७,८२०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. १९/१२/२०२२ रोजी पोस्टे कळमनुरी येथे कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दि. १९/१२/२०२२ रोजी पोस्टे हटटा येथे कलम ३०४(अ),२७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद वाहन चालक याने फिर्यादीचा भाउ मयत नामे राजेश खल्लाळ यास जवळा बाजार येथुन रांजाळा गावाकडे घेवुन जात असतांना त्याचे ताब्यातील वाहन हलगर्जीपणे व निष्काळजीपणे चालवुन त्याचे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.